**पाहिजेत**

**ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत**

नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास फ्रेश/अनुभवी मुले त्वरित पाहिजे.

संपर्क - 9923155996



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



**शैक्षणिक**

**शासकीय कौशल्य विकास बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश**

इलेक्ट्रिकल सुपरवायझर, इलेक्ट्रिकल वायरमन, मोटर वाइंडिंग, ऑटोमोबाइल मैकेनिक टेक्नीशियन, टू थ्री फोरव्हीलर मैकेनिक, कम्प्यूटर ऑपरेटर, कम्प्यूटर पीसी मेंटेनेंस, एसी मैकेनिक, प्लंबर, फिटर, वेल्डर पात्रता 10 वी/12 वी पास/ नापास कॉलेजचे विद्यार्थी, कामगार/कर्मचारी यांनाही प्रवेश ST पास ची, प्लेसमेंट ची, वायरमन लायसन ची सोय

पाटील इलेक्ट्रॉनिक इन्स्टिट्यूट, राधिका रोड, सातारा
मोबाईल 9822097071 वर्ष ४० वे



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २९३ वा | सोमवार, दि. ०६ जुलै २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# दुधात विष कालवणाऱ्यांवर तुकाराम मुंढेंचा 'सर्जिकल स्ट्राईक'!

## सोलापूरसह एकाचवेळी सहा जिल्ह्यांत धडक छापेमारी | अडीच ते तीन कोटींचा मुद्देमाल जप्त, १३ जणांना अटक

## शाम्पू, केमिकल्स मिसळून 'विषारी दूध' पुरवठ्याचा पर्दाफाश

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या दूध भेसळ माफियांच्या मुसक्या आवळत अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली पुणे ग्रामीण पोलीस आणि अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) राज्यव्यापी धडक कारवाई केली. पुणे, सोलापूर, सांगली, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर आणि भिवंडी अशा सहा ठिकाणी एकाचवेळी टाकलेल्या छाप्यांमध्ये तब्बल अडीच ते तीन कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, १३ जणांना अटक करण्यात आली आहे. या कारवाईमुळे राज्यातील दूध भेसळ करणाऱ्या टोळ्यांचे धाबे दणाणले असून, या रॅकेटमध्ये आणखी काही बडे मासे अडकण्याची शक्यता तपास यंत्रणांनी व्यक्त केली आहे.

**४५ अधिकाऱ्यांचे विशेष पथक; गोपनीय नियोजनातून मोठी कारवाई**

दूध भेसळीचे राज्यव्यापी जाळे कार्यरत असल्याची गोपनीय माहिती अन्न व औषध प्रशासनाला मिळाल्यानंतर आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल यांच्याशी समन्वय साधत विशेष कारवाईची आखणी केली. स्थानिक गुन्हे शाखा आणि एफडीएच्या सुमारे ४५ अधिकाऱ्यांचे विशेष पथक तयार करण्यात आले. कोणालाही संशय येऊ न देता रविवारी पहाटे पुणे (मंचर), सोलापूर, सांगली, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर (सिल्लोड) आणि भिवंडी येथे एकाचवेळी छापेमारी करण्यात आली.

या कारवाईदरम्यान मंचरमधून दोन संशयितांना ताब्यात घेतल्यानंतर संपूर्ण रॅकेटची पाळेमुळे उघड झाली. त्यानंतर विविध ठिकाणी धाडसत्र सुरू ठेवत पोलिसांनी एकूण १३ आरोपींना अटक केली.

मंचर पोलीस ठाण्यात या प्रकरणी विविध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून, अटक करण्यात आलेल्या आरोपींना घोडेगाव न्यायालयात हजर करण्यात आले आहे. या प्रकरणाचा तपास पुणे ग्रामीण पोलिसांची स्थानिक गुन्हे शाखा आणि अन्न व औषध प्रशासन संयुक्तपणे करत आहे.

**मंचर बनले होते भेसळीचे मुख्य केंद्र**

तपासादरम्यान उत्तर पुणे जिल्ह्यातील मंचर हे संपूर्ण भेसळ रॅकेटचे मुख्य केंद्र असल्याचे निष्पन्न झाले. मंचरसह खेड, आंबेगाव, जुन्नर आणि शिरूर तालुक्यातील विविध अड्ड्यांवरून मोठ्या प्रमाणात भेसळयुक्त दूध तयार करून राज्यातील विविध भागात पुरवठा केला जात असल्याचे तपासात समोर आले आहे.

**शाम्पू, दूध पावडर आणि घातक केमिकल्सचा वापर**

या प्रकरणातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे दूध भेसळीची पद्धत. तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, दूध उत्पादकांकडून डेअरीमध्ये येणाऱ्या शुद्ध दुधात मोठ्या प्रमाणावर पाणी, वास न येणारा शाम्पू, दूध पावडर आणि विविध घातक रासायनिक पदार्थ मिसळून बनावट दूध तयार केले जात होते.

१,००० लिटर शुद्ध दुधामध्ये तब्बल ५०० लिटरपर्यंत, तर ५०० लिटर दुधात जवळपास ३०० लिटर भेसळ केली जात होती. दुधाचा घट्टपणा आणि रंग कायम राहावा यासाठी विशेष रासायनिक मिश्रणांचा वापर केला जात असल्याचेही तपासात उघड झाले आहे.



**नामांकित कंपन्यांनाही पुरवठा**

भेसळयुक्त दूध केवळ स्थानिक बाजारापुरते मर्यादित नव्हते. हे दूध राज्यातील काही नामांकित डेअरी आणि ब्रँडपर्यंत पोहोचत असल्याचा संशय तपास यंत्रणांनी व्यक्त केला आहे. याच दुधापासून पनीर, खवा आणि इतर दुग्धजन्य पदार्थ तयार करून गेल्या दोन वर्षांपासून बाजारात विक्री होत असल्याची धक्कादायक माहितीही तपासात समोर आली आहे.

यामुळे लाखो नागरिकांच्या आरोग्याशी गंभीर स्वरूपाचा खेळ झाल्याची शक्यता व्यक्त होत असून, या उत्पादनांचा पुरवठा नेमका कोणत्या कंपन्यांना झाला, याचा तपास आता वेगाने सुरू आहे.

**अडीच ते तीन कोटींचा मुद्देमाल जप्त**

या संयुक्त कारवाईदरम्यान भेसळीसाठी वापरले जाणारे रसायने, दूध पावडर, विविध साहित्य, यंत्रसामग्री, वाहने आणि इतर सामग्रीसह एकूण अडीच ते तीन कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जप्त केलेल्या साहित्याची तपासणी करण्यासाठी प्रयोगशाळेत नमुने पाठविण्यात आले आहेत.

**आणखी बडे मासे जाळ्यात येण्याची शक्यता**

या संपूर्ण रॅकेटमध्ये काही मोठे डेअरी चालक, पुरवठादार आणि आर्थिक साखळीतील इतर घटक सहभागी असल्याची शक्यता तपास यंत्रणांनी नाकारलेली नाही. अटक आरोपींकडून मिळालेल्या माहितीनुसार पुढील काही दिवसांत आणखी मोठ्या प्रमाणावर कारवाई होण्याची शक्यता आहे.

**आरोग्याशी खेळणाऱ्यांना सोडणार नाही – प्रशासनाचा इशारा**


दुधासारख्या जीवनावश्यक अन्नपदार्थामध्ये घातक रसायने मिसळून नागरिकांच्या जीवाशी खेळ करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. या रॅकेटमध्ये सहभागी असलेल्या कोणत्याही व्यक्तीची गय केली जाणार नसून राज्यभर अशा टोळ्यांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येणार असल्याचे संकेत प्रशासनाने दिले आहेत.


या धडक कारवाईमुळे राज्यातील दूध भेसळ व्यवसायाला मोठा हादरा बसला असून, सर्वसामान्यांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या माफियांविरोधात प्रशासनाने आक्रमक भूमिका घेतल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

# श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या वर्धापनदिन आणि श्री गुरूपोर्णिमेनिमित्त भव्य सोहळ्याचे आयोजन


## १९ जुलै ते २८ जुलै २०२६ पर्यंत धर्मसंकिर्तन व सांस्कृतिक कार्यक्रम











**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** १९८८ पासून श्री स्वामी समर्थांचे अन्नदानाचे कार्य करीत व सामजिक बांधिलकी जपत सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, पर्यावरणकारक, क्रीडाविषयक कार्य करणारे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ (प.ट्र.नं.एफ-२२७९), अक्कलकोट हे धमार्दाय न्यास संस्थापक अध्यक्ष सन्मा. श्री जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली व न्यासाचे सन्मा. कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील धार्मिक क्षेत्रात नियोजनबध्द मांडणी आणि आखणी असलेल्या सामाजिकतेच्या बरोबरच विविध क्षेत्रात उल्लेखनिय व नेत्रदीपक प्रगतीची वाटचाल करीत असलेल्या श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या ३९ वा. वर्धापनदिन आणि श्री गुरूपोर्णिमा उत्सवानिमित्त धर्मसंकिर्तन व सांस्कृतिक हे कार्यक्रम दि. १९ जुलै ते २८ जुलै २०२६ पर्यंत आयोजन करण्यात आल्याची माहिती न्यासाचे सचिव शामराव मोरे काका यांनी पत्रकारांना दिली आहे.

दि. १९ जुलै रोजी रविवार सायंकाळी ६.३० मिनीटानी कार्यक्रमास प्रारंभ होणार असून, अक्कलकोट विरक्त मठाचे श्री म.नि.प्र. पूज्य बसवलिंग महास्वामीजी, प.पू.श्री मोहन पुजारी - मुख्य पुजारी श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान अक्कलकोट, वे.शा.सं.श्री अण्णू महाराज -पुजारी श्री स्वामी समर्थ समाधी मठ अक्कलकोट, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, तहसिलदार विनायक मगर, अक्कलकोट नगर परिषदेचे मुख्याधिकारी रमाकांत डाके, उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्र टाकणे, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे यांच्या हस्ते श्री स्वामी समथार्चे प्रतिमाचे पूजन, दिप प्रज्वलनाने सदर कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात येणार आहे.

**गुरुपौर्णिमा दिन - दि. २९ जुलै**

दि. २९ जुलै रोजी गुरूपौर्णिमे निमित्त बुधवार सकाळी ७ ते ९ पर्यंत महाप्रसादगृह येथे श्री स्वामी समर्थ चरित्र सारामृत ग्रंथाचे पारायण, सकाळी ९ ते १० पर्यंत नामस्मरण, जप व श्री गुरूपूजा, सकाळी १० वा. खालील मान्यवरांच्या हस्ते श्रींची महाआरती व महानवैद्य दाखविण्यात येणार आहे. यांच्या हस्ते- केंद्रीय सहकार व नागरी उड्डाण राज्य मंत्री ना. मुरलीधर अण्णा मोहळ, राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालक मंत्री ना. जयकुमार गोरे, राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री ना. भरतशेठ गोगावले, आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, सी.ए. महेश गावस्कर, पुणे, अखिल मंडई मंडळ पुणेचे अध्यक्ष व न्यासाचे विश्वस्त जनार्दन उर्फ अण्णा थोरात, सचिन सांबरेकर पालखी परिक्रमा संयोजक बेळगावी, ललिताताई वीर आगासखिंड नाशिक देणगीदार, यांच्या हस्ते आणि अतिथींच्या उपस्थितीत संपन्न होत आहे.

महानैवेद्य व आरतीनंतर उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट संचलित अक्कलकोट नरेश श्रीमंत विजयसिंहराजे भोसले क्रिकेट ट्रेनिंग अ‍ॅकॅडमी उदघाटन प्रमुख उपस्थिती चंद्रकांत पंडित, मा.भारतीय क्रिकेटपटू व प्रशिक्षक व समीर दिघे मा.भारतीय क्रिकेटपटू हे असणार आहेत. सदरचा उदघाटन सोहळा हा गट नं. ५८१, नवीन वाहनतळ, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे होणार आहे.

**एक दृष्टिक्षेप- नव्याने बांधण्यात येणाऱ्या नियोजित महप्रसादगृहाच्या वास्तूवर**

नियोजित महाप्रसाद गृहाची इमारत, भव्य आणि मंदिर सदृश्य असणार आहे. ही इमारत पूर्णपणे वातानुकुलित असून या इमारतीचे बांधकाम क्षेत्र १ लाख १९,३९८ चौरस फुट असणार आहे. इमारतीच्या टेरेसवर श्री स्वामी समर्थांची ५१ फुटांची सुंदर, रेखीव आणि भव्य मुर्ती, सर्वांचे लक्ष वेधून घेईल. या नवीन नियोजित महप्रसादगृहात २५०० भाविकांची महाप्रसादाची व्यवस्था असून, या आराखड्याच्या माध्यमातून हे पाहू शकता की, एकूण ५ हजार भाविकांसाठी बसून सर्व सोयी सुविधांनी युक्त अशा प्रतिक्षा कक्षाचे नियोजन करण्यात आले आहे. शिवाय या इमारतीच्या तळघरामधे धान्य- भाजीपाला कोठार, चटणी व पिठाची गिरणी तसेच १ तासामध्ये ८०० चपाती तयार करता येणाऱ्या ७ मशिन्स, आणि भांडे धुण्यासाठी डिश वॉशर यांची देखील सोय आहे. संपूर्ण इमारतीमध्ये अग्निशामन यंत्रणा बसविण्यात येणार आहे. ही सर्व अत्याधुनिक सोयी सुविधांनी सुसज्ज व प्रशस्त इमारत, स्वामी भक्तांच्या देणगीतून साकार होत आहे. या बांधकामाचा सर्वसाधारण अंदाजे खर्च रुपये ६० कोटी, इतका अपेक्षित आहे. सदर इमारतीस नगरपालिकेची रीतसर बांधकाम परवानगी घेतली आहे. सध्या गेल्या नोव्हेंबर-२०२४ पासून सदरचे काम प्रगतीपथावर आहे, येत्या २ वर्षात हे महाप्रसादगृह भक्तांच्या सेवेत असणार आहे.

**पादुका पालखी व भव्य मिरवणूक**

दि. २९ जुलै रोजी बुधवार सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत सर्व स्वामी भक्तांना महाप्रसाद, सायं ४ वाजता श्री स्वामी समर्थांच्या पादुका पालखी, आणि न्यासाच्या सुशोभित केलेल्या रथाच्या भव्य मिरवणूकीचा दिंड्या व वाद्यांचा गजरात आणि 'नांदब्रम्ह' पुणे व 'आराध्या' चुनाभट्टी, मुंबई या ढोलपथकाच्या तालात आणि अमोलराजे लेझिम संघाच्या शानदार खेळाने शुभारंभ आमदार शेखर निकम, चिपळूण, भरत मित्र मंडळ पुणे अध्यक्ष व न्यासाचे क्रियाशील सभासद बाळासाहेब दाभेकर, भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य शहाजीराजे पवार, सो.म.पा. नगरसेवक व शिवसेना जिल्हाप्रमुख अमोलबापू शिंदे, सो.म.पा. माजी उपमहापौर दिलीप (भाऊ) कोल्हे, ॲड. नितीन हबीब- कायदेशीर सल्लगार, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ व जेष्ठ विधिज्ञ, सो.म.पा. नगरसेवक, मा.स्थायी समितीचे माजी चेअरमन व शहर-जिल्हाध्यक्ष (कॉंग्रेस) चेतन नरोटे, सो.म.पा.मा.शिक्षण सभापती संकेत पिसे, सोलापूर, चुनाभट्टी मुंबईचे माजी नगरसेवक विजुभाऊ तांडेल, देणगीदार संतोष नाईक, सायन मुंबई यांच्या हस्ते पालखी व रथ मिरवणुकीचा शुभारंभ करण्यात येणार आहे.

न्यासाकडून अग्निशामक व रुग्णवाहिका आणि पिण्याच्या पाण्याकरिता गळोरगी येथून पाणी पुरवठा, एस.टी. महामंडळाच्या चालक व वाहकाकरिता विश्रांती गृह याची देखील सोय केलेली आहे. न्यासाकडून राजे फत्तेसिंह क्रीडांगण वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन व सुशोभीकरण, मराठा मंदिर श्री शहाजी हायस्कूल नुतनीकरण करण्यात आले आहे. याबरोबरच तयार केलेल्या कार्यक्रम पत्रिकेत

- पाणी आडवा -पाणी जिरवा -पाण्याचा अपव्यय टाळा.
- पर्यावरणाच्या संतुलनासाठी वृक्षरोपण व वृक्ष संवर्धन करा.
- स्वच्छता अभियान राबवू भारत -महाराष्ट्र अक्कलकोट स्वच्छ करू.
- बेटी बचाओ-बेटी पढावो.
- पाणी हे जीवन आहे.
- स्त्रीभ्रुण हत्या टाळा.
- आपला अन्नछत्र -स्वच्छ अन्नछत्र हा संदेशामुळे विशेष महत्व प्राप्त झालेले आहे. न्यासाला देणगीदारास आयकरात ८० - जी कलमान्वे सवलत आहे.
- वसुंधरेची जपणूक.
- प्लास्टिक वापराव बंदी.

**कुस्तीगरांसाठी दर महा खुराकाचे कीट वाटप :**

तालुक्यातील कुस्तीगीर हे सरावाकरिता कोल्हापूर, पुणे, सोलापूर, धाराशिव, संभाजीनगर आदि ठिकाणी कुस्तीचा सराव करीत आहेत. मात्र त्यांची गरज ओळखून तालुक्याच्या चांद्या पासून बांध्यापर्यंतच्या कुस्तीगरांचा एका विशेष टीमच्या माद्यमातून सर्वे करून तालुक्यातील ७५ पैलवानांची निवड करण्यात आली आहे. न्यासाकडून प्रसाद रुपी खुराकाचे वाटप प्रती महिन्यास करण्यात येत आहे. या कीटमध्ये कुस्तीगीरांना आवश्यक तूप, बदाम, खारीक, बडीसोप, खसखस, इलायीची, धने आदि पदार्थांचे कुस्तीगरांसाठी या जीनसांचा समावेश आहे.

**यंदा श्रींच्या पालखीला लालबाग राजा च्या बॅन्ड ची सलामी**

यंदाच्या गुरुपौर्णिमेच्या दिवशी सायंकाळी हजारो भाविकांच्या साक्षीने, शी स्वामी समर्थ महाराजांना अखंड गरज आणि भक्तीभावाच्या अविस्मरणीय वातावरणात राज वैभवी, निघणाऱ्या श्रींच्या पालखीला लालबागचा राजा, लालबाग मुंबई येथील ख्यातनाम स्वरांजली बॅन्ड पथकाच्या सलामीने मार्गस्थ होणार आहे. सदरचे बॅन्ड हे दरवर्षी लालबाग राजाच्या गणेश उत्सवाच्या काळात प्रतिष्ठापणा पासून ते विसर्जन पर्यंत श्रींच्या सेवेत असतो, यंदाच्या गुरुपौर्णिमेला विशेष आमंत्रित बॅन्ड पाथक हे अन्नछत्र मंडळाच्या पालखी व रथोत्सवाच्या सेवेत असणार आहे.

सदरील कार्यक्रम हे ठरलेल्या दिवशी व वेळेवर स्वामी कृपेने संपन्न होणार असून, सर्व स्वामी भक्तांनी या विविध कार्यक्रमास उपस्थित राहून श्री स्वामी दर्शनाचा व स्वामी सेवेचा लाभ घेऊन कृतार्थ व्हावे, असे आवाहन न्यासाकडून करण्यात आले आहे.

# ५० टक्के सवलतीत १ हजार शिलाई मशीन वाटपाचा उपक्रम

## महिला सक्षमीकरणासाठी शिवसेनेचा उपक्रम

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** ग्रामीण भागातील महिलांना स्वावलंबी बनवून त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शिवसेना ओबीसी विभाग जिल्हाप्रमुख राजकुमार हिवरकर पाटील यांच्या वतीने ५० टक्के सवलतीच्या दरात १ हजार शिलाई मशीन वाटपाचा उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती शिवसेना महिला ओबीसी जिल्हाप्रमुख उमा अकोलकर (माळी) यांनी पत्रकार परिषदेत दिली.



यापूर्वी २६ जून २०२६ रोजी मार्डी येथील पेठेतील मारुती मंदिर परिसरात या उपक्रमाचा पहिला टप्पा पार पडला. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार श्रीकांत शिंदे, खासदार ज्योतीताई वाघमारे, शिवसेना नेते रमेश बारसकर तसेच शिवसेना जिल्हाप्रमुख राजकुमार हिवरकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमात जिल्हा प्रमुख (महिला आघाडी) उमा नागेश अकोलेकर-माळी यांच्या उपस्थितीत पहिल्या टप्प्यात एक हजार शिवणयंत्रांच्या नियोजनापैकी ५०० शिलाई मशीनचे ५० टक्के सवलतीच्या दरात पात्र महिलांना वाटप करण्यात आले. या उपक्रमाला परिसरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

उपक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यात उर्वरित ५०० शिलाई मशीनचे वाटप मार्डी, राजमसले व पंचक्रोशीतील पात्र महिलांना करण्यात येणार आहे. या माध्यमातून अधिकाधिक महिलांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रोत्साहन मिळणार असून, त्यांचे आर्थिक सक्षमीकरण साधण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

राजकुमार हिवरकर पाटील यांनी सांगितले की, महिलांना केवळ शिलाई मशीन उपलब्ध करून देणे एवढाच या उपक्रमाचा उद्देश नसून, त्यांना स्वावलंबी बनविणे, रोजगारनिर्मितीला चालना देणे आणि त्यांच्या कुटुंबाच्या आर्थिक प्रगतीस हातभार लावणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. भविष्यातही महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील महिलांना स्वयंरोजगाराची नवी संधी उपलब्ध होणार असून, त्यांच्या आर्थिक स्वावलंबनाच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल ठरणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

या पत्रकार परिषदेस ज्योत्स्ना भाले, नंदकुमार गरड आदी उपस्थित होते.

# चंद्रभागा वाळवंट स्वच्छतेसाठी विशेष मोहीम, 50 स्वतंत्र कर्मचाऱ्यांची नियुक्ती - पालकमंत्री गोरे

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** आषाढी वारी 2026 च्या पार्श्वभूमीवर चंद्रभागा नदीपात्र व वाळवंटाची स्वच्छता करण्याची विशेष मोहीम प्रशासनाने हाती घेतली आहे. नदीपात्राच्या दोन्ही बाजूला असलेली झुडपे, राडारोडा व कचरा पूर्णपणे काढून सपाटीकरण करावे, नदीकाठाच्या दोन्ही बाजूंची स्वच्छता करावी. तसेच वारीपरी संपूर्ण वाळवंट स्वच्छ करण्याबरोबरच संपूर्ण यात्रा कालावधीत व त्यानंतरही वाळवंटात भाविकांची गर्दी असेपर्यंत स्वच्छता मोहीम सुरू ठेवावी, अशा सूचना ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री मंत्री जयकुमार गोरे यांनी दिल्या.



**स्वच्छतेसाठी स्वतंत्र यंत्रणा**

नदीपात्रात प्लास्टिक व इतर कचरा गोळा करण्यासाठी मोठ्या कचरा कुंड्यांची व्यवस्था करावी, तसेच वाळवंटाच्या सफाईसाठी स्वतंत्र ५० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. वाळवंटाच्या प्रत्येक भागात पाच कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून वाळवंट कायम स्वच्छ राहील, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले. स्वच्छता कर्मचाऱ्यांना विविध भाग वाटून देण्यात आले असून, सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. सध्या सोलापूर जिल्हा परिषदेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांकडून चंद्रभागा नदीपात्रातील वाळवंटाची स्वच्छता करण्यात येत आहे. जिल्हा परिषदेचे अतिरिक्त सफाई कर्मचारीही या मोहिमेत सहभागी झाले आहेत. वारीपूर्वी वाळवंटाची झालेली स्वच्छता पाहून पालकमंत्र्यांनी समाधान व्यक्त केले.

(पान 2 वर..)

# आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर भीमा नदी वाळवंटात स्वच्छता मोहीम

## जिल्हाधिकाऱ्यांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी उचलला कचरा

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** आषाढी वारी २०२६ च्या अनुषंगाने यात्रा कालावधीत १२ ते १५ लाख भाविक श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूर येथे येतात. यातील लाखो भाविक भीमा नदीच्या तीरावर स्नान व दर्शनासाठी येत असतात. मात्र, नदीपात्राच्या दोन्ही बाजूला वाळवंटात कचरा व कचरायुक्त वस्तू मोठ्या प्रमाणात पडलेल्या असतात. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाच्या वतीने भीमा नदीच्या वाळवंटात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी स्वतः वाळवंटातील कचरा उचलून या मोहिमेची सुरुवात केली. त्यांच्या समवेत पोलीस अधीक्षक अतुल



कुलकर्णी, प्रांताधिकारी सचिन इथापे, पंढरपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्यासह महसूल, पोलीस, नगरपरिषद व अन्य विभागांचे अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**भाविकांना स्वच्छ व सुरक्षित वातावरण देण्याचा निर्धार**

आषाढी वारीसाठी येणाऱ्या लाखो वारकरी-भाविकांना स्वच्छ, सुरक्षित व आरोग्यदायी वातावरण मिळावे, या उद्देशाने ही मोहीम हाती घेण्यात आली. चंद्रभागेच्या वाळवंटात प्लास्टिक पिशव्या, निर्माल्य, खाद्यपदार्थांचे अवशेष व इतर कचरा गोळा करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली.

यावेळी जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांनी नागरिकांना व भाविकांना आवाहन केले की, 'पंढरपूर हे लाखो वारकऱ्यांचे श्रद्धास्थान आहे. नदीपात्र व वाळवंट स्वच्छ ठेवणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. प्रशासनाच्या वतीने ही नियमितपणे कचरा उचलण्यासाठी सफाई कर्मचारी नियुक्त करण्यात आलेले आहेत. परंतु नागरिक, भाविक यांनी कचरा वाळवंटात नदी तीरावर कुठेही न टाकता कचराकुंडीत टाकावा व प्रशासनाला सहकार्य करावे. यावर्षीच्या वारीतही स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले.

पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी सांगितले की, यात्रा कालावधीत स्वच्छतेबरोबरच सुरक्षिततेवरही विशेष भर दिला जाणार आहे. नगरपरिषद मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी वारी काळात नियमित स्वच्छता, पिण्याचे पाणी व इतर सुविधा पुरविण्यासाठी यंत्रणा सज्ज असल्याचे स्पष्ट केले.

या मोहिमेमुळे आषाढी वारीपूर्वीच भीमा नदीचे वाळवंट स्वच्छ झाले आहे. तसेच नगरपरिषदेच्या वतीने नियमितपणे स्वच्छता मोहीम राबवली जाणार आहे.

# 'नदी ही जीवन, संस्कृती आणि सभ्यतेचा आधार आहे' : डॉ. राजेंद्र सिंह

**पुणे, (कटूसत्य वृत्त):-** 'नदी म्हणजे केवळ पाणी वाहणारा कालवा नव्हे, तर ती संस्कृती आणि निसर्ग यांना जोडणारा प्रवाह असून जीवन, संस्कृती आणि सभ्यतेचा आधार आहे. नद्या कोरड्या पडल्या, तर त्यासोबत संस्कृती आणि सभ्यतेचाही ऱ्हास होतो.' असे प्रतिपादन जलतज्ज्ञ ज्येष्ठ जलसंवर्धनतज्ज्ञ डॉ. राजेंद्र सिंह यांनी केले. पुण्यातील छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) प्रेक्षागृह येथे 'एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या वतीने आयोजित पुनर्जीवित नदी 'बद्दह' या त्यांच्या हिंदी व रिटा रॉड्रिग्स यांनी अनुवादित केलेल्या मराठी आवृत्तीचा प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते. प्रमुख पाहुणे जेष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. राजेंद्र शेंडे व जेष्ठ समाजसेवक जयाजी पाईकराव यांच्या हस्ते आणि एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या कार्याध्यक्षा प्रा. स्वाती कराड चाटे व संस्थापक कुलगुरू प्रा.



डॉ. गोपालकृष्ण जोशी यांच्या उपस्थितीत या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. माईर्स एमआयटी शिक्षण समूहाचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या शुभ आशीर्वादाने हा सोहळा पार पडला. यावेळी संचालक - स्ट्रॅटेजी अँड ऑपरेशन्स राघवेंद्र एम. चाटे, प्रोजेक्ट डायरेक्टर प्रा. प्रभा कासलीवाल, कुलसचिव प्राणेश मुरनाळ यांच्यासह शैक्षणिक, सामाजिक, उद्योग क्षेत्रातील तसेच जलसंवर्धन व पर्यावरण तज्ञ उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. सिंह म्हणाले " पुणे हे संस्कृती, शिक्षण आणि विचारांचे शहर आहे. मात्र, या शहरातून वाहणाऱ्या नद्यांची अवस्था चिंताजनक आहे. नद्यांचे स्वरूप बदलणे हे त्या भागातील संस्कृतीचा ह्यास होण्याचे लक्षण आहे. सध्याच्या काळात नद्यांना पुन्हा जीवित करण्याची गरज आहे आणि जलसंपत्तीचे संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे." कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. राजेंद्र शेंडे याप्रसंगी बोलताना म्हणाले, "पर्यावरण संरक्षण केवळ धोरणांमधून किंवा आंतरराष्ट्रीय करारांमधून साध्य होणार नाही. हा बदल विद्यापीठे, तरुणाई आणि समाजाच्या सक्रिय सहभागातूनच घडेल. जलसंवर्धन, पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकास हे परस्परांशी जोडलेले विषय असून शिक्षण, संशोधन आणि समाजाभिमुख उपक्रमांचा समन्वय ही काळाची गरज आहे." कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत विद्यापीठाच्या कार्यकारी अध्यक्षा प्रा. स्वाती कराड चाटे यांनी केले. यावेळी बोलतांना त्यांनी एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या शाश्वत विकास, पर्यावरणीय जबाबदारी, जलसंवर्धन आणि सामाजिक सहभाग या मूल्यांवर आधारित विविध उपक्रमांची माहिती दिली. प्रा. स्वाती कराड चाटे म्हणाल्या, 'विद्यार्थ्यांना केवळ गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच पर्यावरण-जागरूक आणि सामाजिकदृष्ट्या संवेदनशील नागरिक म्हणून घडविणे हे विद्यापीठाचे ध्येय आहे. पुनर्जीवित नदी 'बद्दह' हे पुस्तक जलसंवर्धनाच्या विचारांना समाजात नवी दिशा देणारे, लोकसहभागाला प्रेरणा देणारे आणि नव्या पिढीसाठी मार्गदर्शक संदर्भग्रंथ ठरेल." विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. गोपालकृष्ण जोशी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या वतीने डॉ. राजेंद्र सिंह यांच्या पुनर्जीवित नदी 'बद्दह' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यामागची भूमिका स्पष्ट केली. 'जलसंवर्धन आणि पर्यावरण संरक्षण हे विषय केवळ अभ्यासक्रमापुरते मर्यादित राहू नयेत, तर विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष कृतीत उतरावेत, या उद्देशाने एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाने या पुस्तकाच्या प्रकाशनाचा पुढाकार घेतला आहे', असे त्यांनी यावेळी नमूद केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. प्रभा कासलीवाल यांनी केले.

# ध्यान केल्याने मन प्रसन्न राहते - ओंकारेश्वर उटगे

## पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात ध्यान शिबिर



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** आजच्या धावपळीच्या जीवनात ध्यानाचे महत्त्व अधिक वाढले आहे. कामाचा ताण, चिंता, नैराश्य आणि अस्थिर जीवनशैली यांमुळे अनेकांना मानसिक त्रास जाणवतो. अशा वेळी दररोज काही मिनिटे ध्यान केल्यास मन प्रसन्न राहते, आत्मविश्वास वाढतो, सकारात्मक विचार आणि एकाग्रता वाढते, असे प्रतिपादन प्रख्यात कर सल्लागार ओंकारेश्वर उटगे यांनी केले. महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या कै पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात आयोजित केलेल्या ध्यान शिबिर कार्यक्रमात ते बोलत होते.

**ध्यानाचे फायदे आत्मसात करा :**
मनशांती, तणावमुक्त जीवन, सकारात्मक विचार, आनंदी व समाधानी जीवन, अभ्यासात एकाग्रता हे ध्यानाचे फायदे आहेत ते विद्यार्थ्यांनी आत्मसात करावे असे ध्यान प्रशिक्षक ओंकारेश्वर उटगे यांनी सांगितले.

यावेळी संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन मसुती, विद्याधर गुरव, दत्तात्रय कटारे, संतोष जवळगे, मल्लिनाथ सलगर, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी व दिगंबर जगताप उपस्थित होते. यावेळी विद्याधर गुरव म्हणाले की, ध्यानाचा परिणाम शारीरिक आरोग्यावर होतो, नियमित ध्यानामुळे रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत होते, झोपेची गुणवत्ता सुधारते आणि शरीरातील थकवा कमी होतो. त्यामुळे शरीर आणि मन यांच्यात समतोल निर्माण होतो. दत्तात्रय कटारे म्हणाले की, विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी, व्यावसायिक तसेच ज्येष्ठ नागरिक अशा प्रत्येकासाठी ध्यान उपयुक्त आहे.

विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढते, स्मरणशक्ती सुधारते आणि अभ्यासात लक्ष केंद्रित करणे सोपे जाते. प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात काही वेळ ध्यानासाठी दिल्यास निरोगी, आनंदी आणि समाधानी जीवन जगणे अधिक सुलभ होईल.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक निशिगंधा सोमेश्वर यांनी केले, सूत्रसंचालन कल्पना स्वामी यांनी केले तर आभार पर्यवेक्षक सिद्रामप्पा पाटील यांनी मानले.

# पालखी सोहळा, दिंडीधारकांनी प्लॉटसची मागणी नोंदवावी : प्रांताधिकारी सचिन इथापे

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** आषाढी यात्रा एकादशीचा मुख्य सोहळा दि. 25 जुलै 2026 रोजी साजरा होत असून, यात्रा कालावधी 15 ते 29 जुलै 2026 असा आहे. या यात्रेत येणाऱ्या दिंड्यांना वास्तव्यासाठी भक्तीसागर (65 एकर) येथे जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. या ठिकाणी मोफत प्लॉटस भाविकांना तंबू, राहुट्या उभारुन वास्तव्य करण्यासाठी देण्यात येत आहेत. दि.06 जुलै पासून प्लॉट नोंदणी सुरु करण्यात येणार आहे. संबधितांनी भक्तीसागर येथे प्लॉटची मागणी नोंदवावी, असे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आले आहे. आषाढी यात्रेला येणाऱ्या पालखी सोहळ्या सोबत येणाऱ्या दिंड्यांमधील भाविकांच्या निवाऱ्याची सोय भक्तीसागर (65 एकर) येथे करण्यात आलेली आहे. या ठिकाणी भाविकांना निवाऱ्यासोबत पिण्याचे शुद्ध पाणी, शौचालय, वीज कनेक्शन, अन्नपदार्थ शिजवण्यासाठी गॅस वितरण, पोलीस संरक्षण, प्रथमोपचार केंद्र आदी सुविधा या ठिकाणी दिल्या जातात. त्यामुळे या ठिकाणी भाविकांची प्रचंड गर्दी होते. या ठिकाणी एकूण 668 प्लॉट्स भाविकांना निवाऱ्यासाठी दिले जातात.

या ठिकाणी भाविकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी आपत्कालीन मदत केंद्र स्थापन करण्यात येते. येथे प्रशासकीय यंत्रणा सुसज्ज व सुरळीतपणे काम करण्यासाठी तहसीलदार सचिन मुळीक यांची सेक्टर मॅनेजर म्हणून नियुक्ती केली आहे.भाविकांना प्लॉटस वाटप करणे, अडीअडचणी सोडवणे, आपत्कालीन प्रतिसाद केंद्र व त्यावर नियुक्त सेक्टर मॅनेजर व त्याचे अधिनस्त कर्मचारी कार्यान्वित असणार आहेत. दिंडी, पालखी सोहळ्यासमवेत येणाऱ्या भाविकांना भक्तीसागर 65 एकर येथे प्लॉटसचे वाटप करण्यात येणार आहे. आषाढी एकदशीच्या सोहळ्या अगोदर दिंडी, पालखीतील भाविकांने प्लॉटसाठी मागणी करणे आवश्यक आहे.

या ठिकाणी भाविकांना मुलभूत सेवासुविधा पुरवण्यात येणार असून आपत्कालीन प्रतिसाद केंद्रातून भाविकांना सेवा देण्यात येणार आहे. यासाठी नायब तहसिलदार सुधाकर धाईजे (मो.क्र.9767248210), तसेच ग्राम महसूल अधिकारी दादासाहेब पाटोळे (मो.क्र.9970109919), प्रमोद खंडागळे (मो.क्र. 9657290403) तसेच वैभव कट्टे (मो.क्र.9665076066) यांच्याकडे संपर्क साधावा, असे आवाहनही प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
इंद्रभवन :- पुण्यश्लोक आप्पासाहेबवारदपथ,
रेल्वेलाईन्स, सोलापूर-४१३००१
विभागीय कार्यालय क्र. ७ डफरीन चौक, सोलापूर

जा.क्र./ वि.का.क्र.७/ दि. /०७ /२०२६

**सोलापूर महानगरपालिका**
**विभागीय कार्यालय क्र. ७**
**जाहीर प्रसिद्धीकरण मसुदा**

प्रभाग क्र १५ मधील विष्णू चाळ येथील कै राजू दादा कोल्हे व्यायाम शाळा येथे विविध कामे करणे.
सो.म.पा संकेतस्थळ अनु क्र - 6316
वर नमूद कामाचे टेंडर सो.म.पा च्या www. solapurcorporation.gov.in या वेबसाईटवर पासून दि ०३/०७/२०२६ ते दि १०/०७/२०२६ पर्यंत दुपारी १ वाजेपर्यंत पाहण्यास उपलब्ध आहे.

**विभागीय अधिकारी**
**विभागीय कार्यालय क्र. ७**

# 'देवाभाऊ जनआरोग्य अभियान' चा नाझरा येथून शुभारंभ

## जिल्ह्यातील प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात राबविणार : सभापती चेतनसिंह केदार सावंत

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य ग्रामविकास मंत्री तथा सोलापुर जिल्हा पालकमंत्री, आमचे मार्गदर्शक श्री. जयकुमारजी गोरे साहेब व माढा लोकसभा मतदार संघाचे माजी खासदार, आमचे मार्गदर्शक श्री. रणजितसिंह नाईक-निंबाळकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप सोलापूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष तथा सोलापुर जिल्हा परिषद आरोग्य व शिक्षण समितीचे सभापती चेतनसिंह केदार सावंत यांच्या पुढाकारातून आणि संकल्पनेतून 'देवाभाऊ जनआरोग्य अभियान' राबविण्यात येत असून, या अभिनव उपक्रमाचा शुभारंभ आज प्राथमिक आरोग्य केंद्र, नाझरा येथून करण्यात आला.

सभापती चेतनसिंह केदार सावंत स्वतः या अभियानाचे नेतृत्व करत असून, प्रत्येक रविवारी जिल्ह्यातील एका प्राथमिक आरोग्य केंद्राला प्रत्यक्ष भेट देऊन तेथील आरोग्य सेवा, शासकीय योजनांची अंमलबजावणी, उपलब्ध सुविधा आणि नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांचा सखोल आढावा घेणार आहेत. अभियानातील त्रुटींची नोंद घेऊन त्यावर तातडीने कार्यवाही करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांशी समन्वय साधला जाणार आहे.

नाझरा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या भेटीदरम्यान माता व बाल आरोग्य योजना, आयुष्मान आरोग्य मंदिराच्या १३ सर्वसमावेशक सेवा, जननी सुरक्षा योजना, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान, सार्वत्रिक लसीकरण, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम, किशोर आरोग्य, कुटुंब नियोजन, ॲनिमिया मुक्त भारत अभियान, राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम, कुष्ठरोग निर्मूलन, मलेरिया, डेंग्यू व फायलरिया नियंत्रण, असंसर्गजन्य रोग तपासणी, मानसिक आरोग्य सेवा, आयुष्मान भारत, महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना, रोग सर्वेक्षण (IDSP), मोफत औषध वितरण, प्रयोगशाळा सेवा, विविध तपासण्या तसेच १०२ व १०८ रुग्णवाहिका सेवांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी वैद्यकीय अधिकारी, जनआरोग्य समिती (JAS) सदस्य, आशा स्वयंसेविका, आरोग्यसेविका, अंगणवाडी सेविका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांशी संवाद साधून शासनाच्या सर्व आरोग्य योजना प्रत्येक पात्र लाभार्थ्यापर्यंत प्रभावीपणे पोहोचाव्यात, याबाबत आवश्यक सूचना देण्यात आल्या. सेवा वितरणातील त्रुटी दूर करून गुणवत्तापूर्ण, पारदर्शक आणि लोकाभिमुख आरोग्य सेवा उपलब्ध करण्यावर विशेष भर देण्यात आला.



'देवाभाऊ जनआरोग्य अभियान' हा केवळ आढावा घेण्याचा उपक्रम नसून ग्रामीण आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, गतिमान आणि उत्तरदायी बनविण्याचा प्रयत्न आहे. एकही पात्र नागरिक शासकीय आरोग्य योजनांपासून वंचित राहू नये, यासाठी सभापती चेतनसिंह केदार सावंत प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन सातत्याने पाठपुरावा करणार आहे.'

या अभियानामुळे जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या कार्यपद्धतीत गुणवत्ता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व अधिक बळकट होऊन सर्वसामान्य नागरिकांना अधिक दर्जेदार व प्रभावी आरोग्य सेवा उपलब्ध होण्यास निश्चितच मदत होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

या बैठकीस सांगोला पंचायत समिती उपसभापती अजय सरगर, पंचायत समिती सदस्य सदाशिव दबडे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप देवकते, विस्तार अधिकारी जयंत टकले, सुरेश चौगुले, भाऊ पाटील, सुरेश आदाटे, विजयकुमार जावीर, रमेश पाटील, संजय पाटील, प्रवीण पाटील, रियाज काझी तसेच वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

**बोअरवेल**

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**पाहिजेत**

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता
**सिक्युरिटी गार्ड**
त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.


**वर-वधू**



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**
सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) गरजू व्यक्तीस मानपान न पाहता कोणाचीही मदत घेणे उचित असते या अर्थाची म्हण २) टेकडी (हिंदीत) ३) डक उलट लिहा ४) एक आडनाव ५) बाण, तीर ६) एक म्हण-उथळ पाण्याला ***** फार ७) तांदूळ, भात (इंग्रजीत) ९) आजच्या पूर्वीचा गेलेला दिवस ११) परदेस चित्रपटाती अभिनेत्री-*** चौधरी १३) हेराफेरी चित्रपटातील अभिनेता-*** रावल १४) पतीचा भाऊ १६) नाट्य, ड्रामा (मराठीत) १७) शर्ट (ग्रामीण भाषेत) १९) गायीला दिला जाणारा नियमित खुराक २०) नट उलट लिहा २३) बॉडीगार्ड चित्रपटातील अभिनेत्री २६) स्वराज्याची पहिली राजधानी असलेला गड २७) ठाणे लगतचा जिल्हा २९) वांग्यामध्ये मसाला भरून केलेले ३२) वास, गंध ३६) फळातील गोड द्रव ३८) सोळा गुणिले दोन ३९) एक म्हण-दाम करी ** ४१) मार्ग, वाट (हिंदीत) ४२) तीन दुणे ४३) एक (इंग्रजीत) ४४) बारा गुणिले पाच

**आडवे शब्द :** १) भारताचे केंद्रीय नेते-नितीन **** ४) लातूरचे आमदार-अमित **** ७) कोकणातील एक आमदार-नितेश ** ८) पुष्कळ, भरमसाठ ९) बांगड्या विक्रीचा व्यवसाय करणारा १०) तरचा जोडीदार ११) दुधावरील साय १२) स्वभावाने खाष्ट १३) छ. शिवराय या गडावर असताना सिध्दी जोहरने गडाला वेढा टाकला होता १५) कोंढाणा किल्ला घेणारा छ. शिवरायांचा शूर सरदार १८) कापड फाटताना होणारा आवाज २१) पाण्याची लहर २२) दहा वर्षांचा काळ २४) नऊ भागिले तीन २५) पाच आणि सहा मिळून होणारी संख्या २७) तापमान पाहण्यासाठी वापरतात तो धातूचा पातळ चकचकीत घटक २८) घोड्यावर बसल्यानंतर पाय ठेवण्यासाठी असलेली लोखंडी कडी ३०) मवाळच्या विरूध्दार्थी ३१) नाम उलट लिहा ३२) कथेतील पंख असलेली स्त्री ३३) गरम मसाल्यातील एक घटक ३४) घड्याळ (हिंदीत) ३५) नवे कोरे, नवीन कोऱ्या न वापरलेल्या नोटा या अर्थाने ३७) घराच्या पायाभरणीसाठी वापरतात ते दगड, मुरूम इ. मटेरियल ३९) याच्यापासून धागा बनतो ४०) रास उलट लिहा ४२) उन्हाळा (इंग्रजीत) ४३) एक म्हण-काखेत कळसा अन् गावाला *** ४५) अकरा गुणिले तीन ४६) मुलाची पत्नी, स्नुषा

## सुडोकु - 293

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 4 | | | | 5 | 6 | 2 | |
| | 7 | 5 | 9 | | | | 1 | |
| | 3 | | 7 | 2 | | 5 | 9 | |
| | 5 | 4 | | | | 3 | 6 | |
| | | 3 | | 9 | | | | 5 |
| | 6 | | | | 7 | 2 | | |
| 4 | 9 | | 5 | 8 | | 7 | | 6 |
| | 8 | 7 | 2 | | | | 5 | 1 |
| | | 6 | 4 | | | 9 | 8 | |

# पंढरपुरात भव्य भक्तनिवासाचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते लोकार्पण

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर येथे मंचर ग्रामस्थ वारकरी सेवा मंडळाच्या वतीने उभारण्यात आलेल्या धर्मशाळा-भक्तनिवासाच्या नूतन वास्तूचे उद्घाटन व लोकार्पण उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते झाले.

यावेळी माजी गृहमंत्री तथा आमदार दिलीपराव वळसे पाटील, आमदार समाधान आवताडे, आमदार राजू खरे, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर, ह.भ.प. कानोबा महाराज मोरे, यांच्यासह मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**'वारकऱ्यांच्या सेवेसाठी हक्काचे घर'**

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या, 'संपूर्ण महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या चरणी नतमस्तक होते. आजचा दिवस मंचर आणि आंबेगाव तालुक्यातील हजारो ग्रामस्थ-भाविकांसाठी आनंदाचा व भाग्याचा आहे. आषाढी एकादशीच्या निमित्ताने विठ्ठल-रुक्मिणीच्या चरणी सेवा करण्याची संधी मिळाली हे भाग्यच.'



'जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे आपुले, तोचि साधू ओळखावा' या तुकाराम महाराजांच्या अभंगाचा दाखला देत त्या म्हणाल्या, 'ऊन-पावसाची पर्वा न करता पंढरीला येणाऱ्या वारकऱ्यांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा आहे. दिलीपराव वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थ व वारकरी मंडळांनी ही वास्तू उभारली हे कौतुकास्पद आहे.'

**मंचरची ऐतिहासिक परंपरा व वास्तूची उपयुक्तता**

'मंचरला पांडवकालीन बारव, तपेश्वर भूमीची आध्यात्मिक पार्श्वभूमी आहे. संत तुकाराम महाराजांनी 'मंचरी' हा हस्तलिखित ग्रंथ मंचर येथे लिहिला, त्यात ५३७ अभंग आहेत. ही मंचरकरांसाठी अभिमानाची बाब आहे,' असे पवार यांनी नमूद केले.

'वारीमध्ये येणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याला हक्काचा निवारा मिळावा यासाठी ही सुसज्ज धर्मशाळा उपयोगी ठरेल. ही इमारत भक्ती व सेवेचे केंद्र बनेल. मंडळाचे संस्थापक ह.भ.प. मारुती धोंडेबा मोर्डे ऊर्फ अण्णा गुरुजींनी पाहिलेले स्वप्न आज पूर्ण झाले आहे. 'पूर्ण केला मनोरथ' या उक्तीप्रमाणे आंबेगाव-मंचरच्या ग्रामस्थांचे पंढरपुरात हक्काचे घर झाले आहे,' असे त्यांनी सांगितले.

**दानशूरांचे ऋण व पंढरपूर विकास आराखडा**

गोवर्धन समुदायाचे देवेंद्र शहा यांच्यासह अनेक दानशूरांनी प्रकल्पासाठी मोठी मदत केली, त्यांचे ऋण उपमुख्यमंत्र्यांनी व्यक्त केले.

'दादांना पंढरपूर जागतिक दर्जाचे धार्मिक स्थळ बनवायचे होते. पालखी महामार्ग हे त्याचे मूर्तिमंत उदाहरण आहे. त्यांची अनेक स्वप्ने पूर्ण झाली, उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे,' असे त्या म्हणाल्या. श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसर विकास व वाणिज्य संकुल आराखड्याला राज्यस्तरीय शिखर समितीने मान्यता दिली आहे. सुमारे ४,००० कोटींच्या या आराखड्यातून पुरातन मंदिर-मठांचे जतन, भव्य कॉरिडॉर, प्रदक्षिणा मार्ग, चंद्रभागा घाट सुशोभीकरण, आधुनिक वाहनतळ, व्यापारी संकुल, रस्ते, पूल व पालखी तळांचा विकास होणार आहे.

**वारीसाठी सुविधा**

१२ जूनला पुणे विभागीय आयुक्त कार्यालयात १० दिंडी प्रमुख व मंदिर समिती अध्यक्षांची बैठक घेऊन सुरक्षित सुविधा देण्याचे निर्देश दिले.

दिवेघाट-हडपसर व बारामती-इंदापूर मार्गाचे काम प्रगतीपथावर असून लवकरच पूर्ण होईल. वारीसाठी एसटी महामंडळाच्या साडेपाच हजार बसची व्यवस्था करण्यात आली आहे.

'मी तेर या संत गोरा कुंभारांच्या गावची आहे. दर एकादशीला आमच्याकडेही वारी, पालखी, भजन-कीर्तन असते. लहानपणापासून माऊलींशी वेगळे नाते आहे. दादांचे शब्द खरे करून दाखवणे ही माझी जबाबदारी आहे,' असे सांगत, एलनीनोच्या संकटातून महाराष्ट्राला मुक्त करण्याची प्रार्थना त्यांनी विठुरायाचरणी केली.

कार्यक्रमास पंढरपूर व मंचर नगरपालिकेचे नगरसेवक, सेवा मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब थोरात, उपाध्यक्ष सुभाष थोरात, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, शासकीय अधिकारी, पत्रकार व हजारो वारकरी उपस्थित होते.

# आरोग्यमंत्री आबिटकर यांनी वाखरी पालखी तळाची केली पाहणी

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या हस्ते आरोग्यमंत्री आबिटकर यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक तथा आयुक्त संजय काटकर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, जिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजय सरडे, आरोग्य अधिकारी डॉ. महेश सुडके यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.



आषाढी यात्रेनिमित्त पालखी सोहळ्यासोबत येणाऱ्या वारकरी भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज व जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्यासह सर्व संतांचे पालखी सोहळे वाखरी येथे मुक्कामी दाखल होतात. येणाऱ्या लाखो वारकरी भाविकांसाठी आषाढी प्रशासनाच्या वतीने वाखरी पालखी तळावर उपलब्ध करण्यात आलेल्या व देण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांची माहिती आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी घेतली.

यावेळी त्यांनी वाखरी पालखी तळाची पाहणी करून आवश्यक सूचना दिल्या. तळावर शुद्ध पिण्याच्या पाण्याचा मुबलक पुरवठा, स्वच्छता, आरोग्य सुविधा तसेच महिला वारकरी भाविकांसाठी आरोग्य विभागाकडून देण्यात येणाऱ्या सुविधा याबाबत माहिती घेऊन आवश्यक त्या सूचना त्यांनी केल्या.

याप्रसंगी अप्पर जिल्हाधिकारी गणेश नि-हाळी, राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक तथा आयुक्त संजय काटकर, राज्य आरोग्य उपसंचालक डॉ. कैलास बाविस्कर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, जिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजय सरडे, आरोग्य अधिकारी डॉ. महेश सुडके आदी उपस्थित होते.

# वारीत अत्यावश्यक रुग्णांकरिता प्रथमच एअर ॲम्बुलन्सची सुविधाः आरोग्यमंत्री आबिटकर

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** आषाढी यात्रेसाठी पालखी सोहळ्यासोबत लाखो वारकरी भाविक येत असतात. पालखी मार्गावर तसेच आषाढी यात्रा कालावधीत पंढरपूर शहरात मोठ्या प्रमाणात गर्दी होते. या गदीर्तून वारकरी भाविकांना आरोग्य सुविधा तात्काळ मिळाव्यात यासाठी सुसज्ज रुग्णवाहिका, बाईक ॲम्बुलन्सचा वापर करण्यात येतो. यावर्षीपासून अत्यावश्यक रुग्णांकरिता नावीन्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून एअर ॲम्बुलन्सची सुविधा उपलब्ध करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली.

आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर वारकरी भाविकांना पालखी मार्ग व तळांवर देण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधांबाबतच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस आमदार समाधान आवताडे, आमदार राजू खरे, ऑनलाईनव्दारे आमदार अभिजीत पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, नगराध्यक्षा प्रणिता भालके, पंचायत समिती सभापती शुभम आगवणे, अपर जिल्हाधिकारी गणेश नि-हाळी, कार्यकारी अभियंता अमित निमकर, राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक तथा आयुक्त संजय काटकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड, मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्यासह जिल्ह्यातील उपजिल्हा रुग्णालयांचे वैद्यकीय अधीक्षक, तालुका आरोग्य अधिकारी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

यावेळी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, 'वारकरी वारीसाठी घरातून बाहेर पडल्यानंतर पुन्हा घरी पोहोचेपर्यंत आरोग्याच्या सर्व आवश्यक सुविधा पुरवण्याचे नियोजन आरोग्य विभागाने केले आहे. त्या नियोजनाप्रमाणे सर्व सेवा पुरवाव्यात. वारी कालावधीत भाविकांना डिजिटल आरोग्य सुविधा देण्यात येणार आहेत. 'आरोग्य संपन्न वारी' व 'वारी सहाय्य' या माध्यमातून पालखी मार्गावर वारकरी भाविकांना तात्काळ आरोग्य सुविधा उपलब्ध होणार असून,



यामध्ये प्रत्येक आरोग्य कर्मचारी व आशा सेविका यांच्यामार्फत माहिती उपलब्ध करून देण्यात येणार आहे.'

'वारकरी भाविकांना आरोग्य सुविधा पुरवताना कोणतीही उणीव राहू नये. वारी कालावधीत आरोग्य सुविधा देण्यासाठी पंढरपूर येथील स्थानिक डॉक्टरांची उपलब्धता राहण्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक यांनी स्वतंत्र बैठक घेऊन त्यांना सूचना द्याव्यात. पालखी मार्गावरील तसेच शहरातील खासगी वैद्यकीय रुग्णालयांतील दहा टक्के खाटा आरक्षित करण्यात येणार आहेत,' असे त्यांनी सांगितले.

पालखी मार्गावर वारकरी, भाविकांसाठी ४३ ठिकाणी सुसज्ज आयसीयूची सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे. तसेच प्राथमिक उपचारांसाठी १५६ ठिकाणी 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' वारकरी भक्तांसाठी उभारण्यात येणार आहेत. २१५ फिरते आरोग्य दूत नेमण्यात येणार आहेत. पंढरपूर उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयांमध्ये १६ ठिकाणी सुसज्ज आयसीयू कक्ष व १७ ठिकाणी तात्पुरते 'आपला दवाखाना' सुरू राहणार आहेत, अशी माहिती श्री. आबिटकर यांनी दिली.

पालखी मार्गावर एकूण ३५३ रुग्णवाहिका सज्ज ठेवण्यात येणार आहेत. त्याचबरोबर दिंडी प्रमुखांना प्राथमिक औषधोपचार किटचे वाटप करण्यात येणार आहे. वारकरी भाविकांना आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी ३ हजार ८७ वैद्यकीय अधिकारी-कर्मचारी तसेच फिरते मनुष्यबळ उपलब्ध राहणार आहे. त्याचबरोबर ३०२ विशेष तज्ज्ञांची नेमणूक करण्यात येणार आहे.

पंढरपूर येथे वारकरी भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता तीन दिवस आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. 'वारीत वारकऱ्यांची सेवा करणे हे भाग्याचे आहे. सर्वांनी पांडुरंगाच्या सेवेचा भाग म्हणून सहभागी व्हावे,' असे आवाहन आरोग्यमंत्र्यांनी यावेळी केले.

यावेळी आमदार समाधान आवताडे यांनी पंढरपूर जिल्हा रुग्णालयातील २०० बेडच्या हॉस्पिटलसाठी आवश्यक ती कार्यवाही करून हॉस्पिटल सर्व सुविधायुक्त कार्यान्वित करावे, अशी सूचना केली. वारी कालावधीत शहरात आयसीयू सेंटरची संख्या वाढवावी, असेही त्यांनी सांगितले. आमदार राजू खरे यांनी पालखी मार्गावरील सुविधा व उपजिल्हा रुग्णालयातील सुविधा व स्वच्छता कायम ठेवावी, असे सांगितले. आमदार अभिजीत पाटील यांनी वारी कालावधीत ६५ एकर परिसरात वारकरी भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी असल्याने या ठिकाणी आरोग्य शिबिराचे आयोजन करावे, अशी मागणी केली.

नगराध्यक्षा प्रणिता भालके यांनी वारी संपल्यानंतर संसर्गजन्य आजार उद्भवण्याची शक्यता असल्याने आरोग्य सुविधा उपलब्ध ठेवाव्यात, असे सांगितले.

यावेळी आरोग्य उपसंचालक डॉ. भगवान पवार यांनी पीपीटीद्वारे वारी कालावधीत वारकरी भाविकांना देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती दिली.

**पंढरपूर उप जिल्हा रुग्णालयाला आरोग्यमंत्र्यांची भेट-**

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी उपजिल्हा रुग्णालय, पंढरपूर येथे भेट देऊन रुग्णालयाची पाहणी केली. व रुग्णालयाची स्वच्छता पाहिली. तसेच रुग्णांशीही संवाद साधून त्यांना मिळत असलेल्या आरोग्य सुविधांची माहिती घेतली. तसेच आरोग्य अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

# शिक्षण हाच समाजाच्या प्रगतीचा राजमार्ग- कुंभार



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** ज्ञानामुळे माणसाला योग्य दिशा मिळते.उत्तम शिक्षण घेतल्यानंतरच समाजिक मूल्ये आपोआप रुजतात.यामुळे समाजाबरोबरच राष्ट्राचाही सर्वांगीण विकास होतो म्हणून प्रत्येकाने शिक्षणाला महत्त्व द्यावे. शिक्षण हाच समाजाच्या प्रगतीचा राजमार्ग असल्याचे प्रतिपादन नेताजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांनी केले. निलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस कन्नड भाषा व कन्नड संस्कृती संवर्धक कुंभार समाज शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने कुंभार समाजातील ४९ गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा उत्साहात पार पडला यावेळी अण्णाराव कुंभार बोलत होते. प्रथम श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी व तपोरत्न योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले तदनंतर कुंभार समाजातील दहावी व बारावीच्या ४९ गुणवंत विद्यार्थ्यांचा पालकांसह सन्मान करून धनादेश प्रदान करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर यावेळी संस्थेच्या खजिनदार ललिता कुंभार, माजी जिल्हाध्यक्ष हनुमंत कुंभार, प्राचार्य रविशंकर कुंभार, गुरुसिद्ध कुंभार, लेखापरीक्षक महेश आळंगे, सेवानिवृत्त प्राचार्य रेवणसिद्ध रोडगीकर, सुभाष धुमशेट्टी, विजयकुमार हुल्ले, ज्ञानेश्वर म्हेत्रे, लक्ष्मण यादव , मल्लिकार्जुन गुरव,धर्मराज बळ्ळारी, लक्ष्मीकांत त्रिशूले, मुख्याध्यापक शिवानंद मेणसंगी, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, विजयालक्ष्मी कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे अण्णाराव कुंभार म्हणाले, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव हा समाजाच्या उज्ज्वल भविष्यास दिशा देणारा उपक्रम आहे. श्रम, जिद्द आणि प्रामाणिकपणाच्या बळावर यश मिळविता येते. बदलत्या काळात पारंपरिक व्यवसायासमोरील आव्हाने लक्षात घेता शिक्षण हाच समाजाच्या प्रगतीचा प्रभावी मार्ग असल्याचे सांगून पालकांनी मुलांवर चांगले संस्कार करावेत. प्रामाणिकपणा, जबाबदारी आणि आई-वडिलांप्रती आदर हीच यशाची खरी गुरुकिल्ली असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.कुंभार समाजाचे माजी जिल्हाध्यक्ष हनुमंत कुंभार म्हणाले, अण्णाराव कुंभार यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी आहे.त्यांनी संघर्ष, परिश्रम आणि चिकाटीतून शिक्षणाची गंगा समाजाच्या घराघरांत पोहोचवली. अनेक वंचित विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले. त्यांच्या कायार्तून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेऊन समाजऋण फेडण्याची भावना जोपासावी. गुणवंत होण्याबरोबरच संस्कारित आणि चारित्र्य जपणारा नागरिक बनणे अधिक महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. सेवानिवृत्त प्राचार्य रेवणसिद्ध रोडगीकर म्हणाले, विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून शिक्षणाच्या बळावर यश संपादन करावे, पालकांच्या कष्टांची जाणीव ठेवून ध्येयपूर्तीसाठी सातत्याने प्रयत्न करावेत. अण्णाराव कुंभार यांनी होतकरू विद्यार्थ्यांसाठी केलेले कार्य अनुकरणीय असून समाजातील सक्षम व्यक्तींनी शिक्षणासाठी मदतीचा हात पुढे करावा, असे पुढे त्यांनी आवाहन केले. यावेळी समाजातील बाबुराव कुंभार, मल्लिकार्जुन कुंभार, विजयकुमार कुंभार, श्रीशैल कुंभार, प्रविण कुंभार, विठ्ठल कुंभार, सिद्धाराम कुंभार, चंद्रकुमार कुंभार, गोदावरी कुंभार, उमादेवी कुंभार आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वाराध्य मठपती यांनी केले, तर मुख्याध्यापिका वैशाली कुंभार यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी गणपती पाटील, राजेंद्र मुलगे, शिवानंद पुजारी, प्रकाश कोरे, मीनाक्षी वांगीकर, विनायक कोरे, चंद्रशेखर पाटील, रेवणसिद्ध दिसले आदी परिश्रम घेतले.

**यांचा झाला सन्मान**

अक्षय कुंभार (९३.८३),तेजस्वी कुंभार (९३.८०), अनुराधा कुंभार (९१.२०), वैभवी कुंभार (९०.२०),काजल कुंभार (८८.८०), राजकुमार कुंभार (८८.८०), हर्षवर्धन कुंभार (८४.६०),भक्ती कुंभार (८४.००), विठ्ठल कुंभार (८२.६०),संजोती कुंभार (८०.४०),ओम कुंभार (८०.१६) या विद्यार्थ्यांसह ४९ कुंभार समाजातील दहावी व बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

# विजयवाडी येथे सशस्त्र दरोड्याचा थरारक छडा

## तीन आरोपींना बेड्या,१२ लाखांचे सोने जप्त

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विजयवाडी (ता.माळशिरस) येथे मे २०२६ महिन्यात घडलेल्या अत्यंत धाडसी आणि सशस्त्र दरोड्याचा छडा लावण्यात अकलुज पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला मोठे यश आले आहे.या गुन्ह्यात आतापर्यंत दोन मुख्य दरोडेखोरांसह चोरीचे सोने खरेदी करणाऱ्या एका सोनाराला अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून चालू बाजार भावाप्रमाणे तब्बल १२,४६,५४६ रुपये किमतीचे ८४.७६ ग्रॅम वजनाचे सोने हस्तगत करण्यात आले आहे.या गुन्ह्याच्या सखोल तपासादरम्यान महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांत गंभीर गुन्हे दाखल असलेल्या आणखी चार सराईत दरोडेखोरांची नावे निष्पन्न झाली असून पोलीस त्यांच्या मार्गावर आहेत.

**गुन्ह्याची पार्श्वभूमीः-**

दिनांक १७ मे २०२६ रोजी मध्यरात्री ०१/०० ते ०२/०० वाजण्याच्या सुमारास विजयवाडी (ता.माळशिरस) येथील रहिवासी फियार्दी प्रदिपसिंह शंकरराव कदम (वय ६८ वर्षे) यांच्या घरात चार अनोळखी शस्त्रधारी दरोडेखोरांनी प्रवेश केला. दरोडेखोरांनी फिर्यादीच्या छातीला गलोल लावून त्यांना,त्यांच्या पत्नी व सासू यांना मारहाण करण्याची भीती दाखवली.त्यानंतर आरोपींनी महिलांच्या अंगावरील सोन्याचे दागिने,देवघरातील व कपाटातील रोख रक्कम असा मुद्देमाल जबरदस्तीने चोरुन नेला होता. याप्रकरणी अकलूज पोलीस ठाण्यात बीएनएस कलम ३०९ (४), ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक विशाल कदम करीत होते.



**स्थानिक म्होरक्याच्या मदतीने 'रेकी' वृद्ध दांपत्याला केले लक्ष्य**

पोलिसांच्या सखोल तपासात समोर आले आहे की,दरोडेखोरांनी स्थानिक गुन्हेगाराच्या मदतीने विजयवाडी येथील या घराची पूर्ण रेकी (पाळत) केली होती.घरात केवळ वृद्ध दांपत्य आणि त्यांची वयोवृद्ध सासू राहतात जे मध्यरात्रीच्या वेळी कोणताही मोठा प्रतिकार करू शकणार नाहीत, याची पक्की खात्री स्थानिक आरोपीने टोळीला दिली होती. हा दरोडा पूर्णपणे यशस्वी होईल असा अचूक अंदाज बांधूनच अतिशय नियोजनबद्ध रितीने हा गुन्हा करण्यात आला होता.

**पोलिसांचा तपास आणि अचूक कारवाई**

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन विशेष पोलीस महानिरीक्षक रंजनकुमार शर्मा,पोलीस अधीक्षक सोलापुर ग्रामीण अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक विजय कबाडे,उपविभागीय पोलीस अधिकारी अकलुज विभाग अकलुज संतोष वाळ्के,पोलीस निरीक्षक निरज उबाळे यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकास तात्काळ गुन्हा उघडकीस आणण्याचे सुचना दिल्या.तपास पथकाने विजयवाडी गावच्या आसपासचे सर्व सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल टॉवर डंप डेटाचे विश्लेषण आणि रेकॉर्डवरील संशयित दरोडेखोरांच्या हालचालींची तांत्रिक पडताळणी केली.या सायबर व तांत्रिक विश्लेषणातून पोलिसांनी अत्यंत कौशल्याने दरोडेखोरांचा मार्ग काढला

**'पोलिसांनी वेषांतर करून हॉटेलमध्ये वेटर बनून दरोडेखोराला ठोकल्या बेड्या !'**

सदर गुन्ह्यातील मुख्य आरोपी दरोडा टाकल्यापासून गायब होता. पोलीस आपल्या पाठीवर असण्याची चाहूल लागल्यामुळे तो अत्यंत सावधगिरी बाळगत पोलिसांना सतत गुंगारा देत होता. दरम्यान हा आरोपी धाराशिव जिल्ह्यातील कळंब येथील एका हॉटेलमध्ये येणार असल्याची खात्रीशीर माहिती तपास पथकाला मिळाली.पोलिसांनी तात्काळ तिथे पोहोचून सापळा रचला आणि हॉटेलमध्ये थेट वेटरचे वेषांतर करून थांबले.आरोपी हॉटेलमध्ये येताच वेटरच्या वेषातील पोलिसांनी झडप घालून अत्यंत शिताफीने त्याला ताब्यात घेतले.

**पुरावा नष्ट करण्यासाठी सोन्याचे दागिने वितळवून बनवले शिक्के**

अटक केलेल्या आरोपींची कसून चौकशी केली असता आरोपी यांनी त्यांचे साथीदारांचे मदतीने दरोडा टाकुन लुटलेले सोने धाराशिव जिल्ह्यातील त्यांचा एक साथीदार असलेला सोनार याच्या मार्फत विकल्याची कबुली दिली.तपास पथकाने तात्काळ धाराशिव येथे जाऊन सोनाराला अटक केली.या सोनाराने गुन्ह्याचा कोणताही पुरावा शिल्लक राहु नये म्हणून ते दागिने तात्काळ वितळवले आणि त्याचे सोन्याचे शिक्के तयार करून पुढे दुसरे सोनाराला विकले होते. पोलिसांनी त्यांच्याकडून वितळवलेले ८४.७६ ग्रॅम सोने जप्त केले असून,त्याची चालू बाजार भावाप्रमाणे किंमत १२,४७,५४६ रुपये आहे.

**गुन्ह्यात अटक करण्यात आलेले आरोपी**

आशिष बप्पा काळे (रा.डिकसळ ता.कळंब जि.धाराशिव),प्रकाश कैलास भगवे (रा विजयवाडी ता माळशिरस),निलेश महादेव चव्हाण रा.कळंब जि धाराशिव (गुन्हयातील साथीदार सोनार)

**आणखी चार सराईत गुन्हेगार निष्पन्न**

या गुन्ह्याच्या तपासात टोळीतील आणखी चार मुख्य आरोपींची नावे निष्पन्न झाली आहेत. हे चारही आरोपी रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून त्यांच्यावर वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत.सदर फरार आरोपींच्या अटकेसाठी पोलीस पथके रवाना करण्यात आली आहेत.

**उत्कृष्ट कामगिरी करणारे गुन्हा प्रकटीकरण पथक**

सदरची कौतुकास्पद कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे,उपविभागीय पोलीस अधिकारी (अकलूज) संतोष वाळके यांच्या मार्गदर्शनाखाली अकलूज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नीरज उबाळे,सपोनि विक्रम साळुंखे,पोलीस उपनिरीक्षक विशाल कदम,पोहेकॉ सुहास क्षिरसागर,विक्रम घाडगे,शिवकुमार मदभावी,विनोद साठे,दत्ता खरात, सोमनाथ माने,पंडित गवळे, तुकाराम माने देशमुख आणि सायबर शाखेचे प्रवीण मेटकरी यांच्या पथकाने यशस्वीपणे कामगिरी बजावली आहे.सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विशाल कदम हे करीत आहेत.

# डॉक्टर, शेतकरी व सी.ए. दिनानिमित्त मान्यवरांचा गौरव



**अक्कलकोट, (कटूसत्य वृत्त):-** डॉक्टर डे, शेतकरी दिन व सी.ए. डे निमित्त लायन्स क्लब ऑफ अक्कलकोट यांच्या वतीने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे आयोजन क्लबचे अध्यक्ष ला. अभय खोबरे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.

या प्रसंगी अक्कलकोट शहराचे नगराध्यक्ष श्री मीलनदादा कल्याणशेट्टी यांच्या शुभहस्ते डॉ. संतोष मोटे (डायबेटॉलॉजिस्ट), डॉ. मल्लीनाथ पाटील, डॉ. श्रीकांत पाटील, डॉ. अमरदीप कंदले व सौ. डॉ. दीपा कंदले यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

तसेच शेतकरी दिनानिमित्त जोकारे, टोमॅटो किंग जोकारे तसेच प्रमोद पाटील या प्रगतिशील शेतकऱ्यांचाही नगराध्यक्षांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

सी.ए. डे निमित्त सोलापूरचे सी.ए. श्री राच्चा व अक्कलकोटचे सी.ए. ओमकार उटगे यांचा विशेष सत्कार करून त्यांच्या व्यावसायिक योगदानाचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास माजी प्रांतपाल ला. राजशेखर कापसे, ला. प्रभाकर मजगे, ला. शिरीष पंडित, लायन्स स्कूल कमिटीचे चेअरमन ला. राजेंद्र हत्ते, ला. गौरीशंकर कल्याणशेट्टी, ला. मल्लीनाथ साखरे, ला. विठ्ठल तेली, सचिव ला. शिवशरण खुबा, ला. सुभाष गडसिंग, तसेच मुख्याध्यापिका, शिक्षकवृंद, कर्मचारी व लायन्स क्लबचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या समारोपावेळी डॉ. संतोष मोटे यांनी मधुमेह प्रतिबंध, योग्य आहार, नियमित व्यायाम व आरोग्यदायी जीवनशैली याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनाचा उपस्थितांनी लाभ घेतला. समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करून लायन्स क्लब ऑफ अक्कलकोटने सामाजिक बांधिलकीची जपणूक करत प्रेरणादायी उपक्रम राबविल्याबद्दल उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

# TET पेपरफुटीप्रकरणी शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची युवा महासंघाची मागणी

**सोलापूर,(कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHA-TET) प्रश्नपत्रिका फुटीच्या निषेधार्थ भारताचा लोकशाहीवादी युवा महासंघ (DYFI) च्या वतीने गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करून जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांना निवेदन देण्यात आले. जिल्हाध्यक्ष विक्रम कलबुर्गी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या प्रतीकात्मक प्रतिमेचे फाडून निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी युवा महासंघाचे चे केंद्रीय समिती सदस्य ॲड. अनिल वासम यांनी MAHA



TET पेपरफुटी ही लाखो विद्यार्थी व बेरोजगार युवक-युवतींच्या भविष्याशी झालेली गंभीर प्रतारणा असल्याचे सांगत, या प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी केली. निवेदनाद्वारे पेपरफुटी प्रकरणाची उच्चस्तरीय व वेळबद्ध चौकशी, दोषींवर कठोर कारवाई, विद्यार्थ्यांच्या नुकसानीची भरपाई आणि भविष्यात सुरक्षित व पारदर्शक परीक्षा व्यवस्था लागू करण्याची मागणी करण्यात आली. मागण्या मान्य न झाल्यास राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा युवा महासंघाचे राज्य सचिव दत्ता चव्हाण यांनी दिला.

यावेळी जिल्हा कोषाध्यक्ष बालकृष्ण मल्याळ, विजय हरसुरे, अमित मंचले, अभिजित निकंबे, राधागोपाळ बंडी, विलास कमलापुरे यांच्यासह युवा महासंघाचे कार्यकर्ते उपस्थित होते.